e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# समाज जागृतीचे प्रभावी माध्यमे : चित्रपट पटकथा लेखन

**प्रा. डॉ. सुर्यकांत हरिश्चंद्र गित्ते**

सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,

भगवान बाबा कला व वाणिज्य

महाविद्यालय, लोणार. जि. बुलढाणा.

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.51

**प्रास्ताविक :**

समाज प्रबोधन, समाज जागृती हे त्या-त्या काळाची गरज असते. समाज प्रबोधनाची माध्यमे सुद्धा तो काळच ठरवत असतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात समाज प्रबोधनाचे माध्यम हे वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तके ही होती. प्राचीन कालखंडात समाज प्रबोधनाचे  कार्य हे संतांनी आपल्या विचारातून, अभंगातून, भारुडातून, स्फूट पद्य रचनामधून केल्याचे दिसून येते. त्या-त्या कालखंडातील सामाजिक प्रश्न वेगळे असतात. सामाजिक समस्या काळानुरूप भिन्न असतात. त्यामुळे समाज प्रबोधनाची माध्यमे सुद्धा भिन्न असल्याचे दिसून येतात.

आज समाजात अनेक समस्या, सामाजिक प्रश्न, समाज विघातक प्रवृत्तीने उच्छाद मांडला आहे. या समाज विघातक प्रवृतीला आळा घालण्यासाठी, समाज प्रबोधन करण्यासाठी आज विविध माध्यमांचा वापर केला जात आहे. त्यात वर्तमानपत्रे, नियतकालिके, अनियतकालिके, टीव्ही, विविध समाज माध्यमे, चित्रपट, सिरीयल, व्हाट्सअप, युट्युब, फेसबुक, टेलिग्राम इ. या सर्वात प्रभावी माध्यम चित्रपट असल्याचे दिसून येते.  आज ही सर्वसामान्य माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवण्याचे काम चित्रपट करतात.

अनेक चित्रपटांनी प्रबोधनाचे काम केले आहे. नव्हे प्रबोधनाच्या हेतूनेच अशा चित्रपटांची निर्मिती केली जाते. अशा चित्रपटांचे पटकथा लेखन करतान लेखकाच्या समोर सुद्धा हाच हेतू असतो. उदा. समाजात जातीय द्वेष, उच्चनीचता, हलक्या जाती बद्दल समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन या सामाजिक प्रश्नांना घेऊन नागराज मंजुळे यांनी 'फॅन्ड्री' चित्रपटाचे पटकथा लेखन केल्याचे दिसून येते. तसेच समाजात अलीकडच्या काळात ऑनर क्लीनिंग होताना दिसून येत आहे. स्वतःला प्रगत म्हणून घेणाऱ्या समाजात अशा दुर्दैवी घटना घडत आहेत. हा प्रश्न घेऊन नागराज मंजुळे यांनी 'सैराट' चित्रपटाचे पटकथा लेखन केले आहे. समाजात सध्या खूप मोठ्या प्रमाणात गरीब-श्रीमंत दरी निर्माण होत आहे. ही एक सामाजिक एक्याच्या दृष्टीने धोकादायक बाब आहे. हा प्रश्न घेऊन नागराज मंजुळे यांनी 'झुंड' चित्रपटाचे पटकथा लेखन केले आहे. अशा अनेक समस्या घेऊन लेखक, चित्रपट दिग्दर्शक, निर्माते चित्रपटाची पटकथा लेखन करून चित्रपट निर्मिती करत असतात. समाजासमोर अनेक समस्या आहेत. जसे पर्यावरण, शिक्षणाचे गुन्हेगारीकरण, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, जातीयता, गरीब-श्रीमंत वाढती दरी, शहरीकरण, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी इ. बरोबरच सामाजातील अपंगाचे प्रश्न ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. हा विषय घेऊन सुद्धा अनेक चित्रपटाचे पटकथा लेखन झाले आहे. त्यात 'स्पर्श', 'तारे जमीन पर' 'श्वास' इ.

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

चित्रपट हे केवळ लोकांचे मनोरंजनाचे साधन नसून मनोरंजनाबरोबरच त्यांना शिक्षित करून त्यांच्या दैनंदिन व्यवहारात आणि दृष्टिकोनात बदल घडवून आणण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. लोकांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी चित्रपट हे प्रभावी माध्यम बनले आहे. असं म्हटलं जातं की "चित्रपटांमध्ये जग बदलण्याची ताकद आहे". चित्रपटाचा साधन म्हणून वापर करून भूत, वर्तमान, भविष्यातील सामाजिक समस्या सोडवण्याचा, त्यावर उपाय शोधण्याचा विचार झाला पाहिजे.

दिव्यांगता आणि त्यांच्या समस्या ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के लोक दिव्यांग आहेत. दिव्यांगाबद्दल समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. या प्रश्नाला घेऊन अनेक चित्रपट निर्माण झाले आहेत. अनेक चित्रपटातून अपंगत्वाच्या चित्रणाच्या बाबतीत प्रामुख्याने दया, माया, सहानुभूती या भूमिकेतून पाहणारा एक वर्ग असतो. आणि अपंगत्वाकडे भेदभाव, तुच्यता, निर्दयता या दृष्टीने  पाहणारा एक वर्ग असतो. चित्रपटाद्वारे अपंगत्वाकडे एक सामाजिक समस्या म्हणून विचार केला जातो. अपंगत्वाच्या या समस्येवर समाजाला नवी दिशा, नवी अध्यात्मिक जाणीव, नवा दृष्टीकोन देणारे चित्रपट व त्यांचे पटकथा लेखन झाल्याचे दिसून येते. दिव्यांगाना समाजात दिल्या जाणाऱ्या सामाजिक वागणुकी विरुद्ध चित्रपटाच्या माध्यमातून आवाज उठवण्याचे काम केले जाते. नव्हे तर या वागणुकी विरुद्ध चित्रपट बंड करतात असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.

समाजातील वास्तवावर प्रकाश टाकण्यासाठीच चित्रपटाची निर्मिती होणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात चित्रपट हे मनोरंजनाचे, केवळ मनोरंजनासाठी थिल्लर पटकथा लेखन झाल्याचे दिसून येते. समाज वास्तवाचे चित्रण करण्याचे चित्रपट हे सशक्त माध्यम आहे. याचा विचार करून पटकथा लेखन झाले पाहिजे. चित्रपटांनी मानवतेचे खरे चित्र दाखवावे. हे सत्य आपण नाकारू शकत नाहीत. लोक चित्रपट पाहताना पात्रांच्या माध्यमातून पटकथानकाशी जोडले जातात. चित्रपट म्हणजे कथा असते. ही कथा दृकश्राव्य साधनांच्या माध्यमातून लोकांवर बिंबवायची असते. चित्रपटाच्या पटकथाकाराला, दिग्दर्शकाला, चित्रपटाच्या माध्यमातून काहीतरी सांगायचे असते. समाजातील समस्यावर लक्ष केंद्रित करायचे असते. चित्रपटांमधून केवळ प्रेम कथाच नसता तर सामाजिक समस्या घेऊन उत्कृष्ट चित्रपट निर्मिती झाल्याचे दिसून येते. याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये अपंगत्वाच्या समस्येवर प्रकाश टाकण्याऱ्या चित्रपटाचा विचार केला जाणार आहे.

अपंगत्व ही एका विशिष्ट समाज घटकाशी संबंधित समस्या आहे. जगातील लोकसंख्येच्या १५ टक्के लोक अपंगत्वाने बाधित आहेत. पण या गोष्टीकडे कोणाचे लक्ष जात नाही. याकडे कोणी गांभीर्याने पाहत नाही. त्यांचा आवाज दाबला जातो. या अपंगत्वाने ग्रस्त १५ टक्के समुदायाचा गट जागतिक स्तरावर सर्वात गरीब आणि अशक्त गट आहे. अशा मूकसमाजाकडे मानवतेच्या व न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची नवी दृष्टी समाजाला निर्माण करून देण्याचे काम अलीकडील काही चित्रपटांनी केल्याचे दिसून येते. अनेक लेखक आणि दिग्दर्शकांनी या विषयावर चित्रपट बनवले. त्यांनी या विषयाचे गांभीर्य समाजासमोर मांडून जागरूकता निर्माण करण्याचे काम केले आहे.

अपंगत्व ही एक शिक्षा आहे आणि ती त्यांनी निमुटपणे सहन केली पाहिजे असा समाजाचा दृष्टिकोन आहे. हा दृष्टीकोन बदलण्याच्या हेतूने 'स्पर्श' हा सर्वात जुना चित्रपट आहे. हा चित्रपट अंधशाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवनाचा आणि भावनांचा शोध घेतो. यात नसिरुद्दीन शहा अंधशाळेच्या मुख्याध्यापकाच्या भूमिकेत असतो. जो दृष्टीदोषाने ग्रस्त असतो. आणि शबाना आजमी शाळेतील शिक्षिकेची भूमिका साकारताना दिसते. त्यांचे एकमेकावर प्रेम जूळते यात अंध व्यक्तीच्या असुरक्षिततेची, परावलंबित्वाची, जगण्यातील संघर्षाची, गुंतागुंतीची जाणीव प्रेक्षकांना होते. या चित्रपटातून त्या पात्राबद्दल सहानुभूती वाढते. त्यांच्या भावनिक भावजींनाशी प्रेक्षक एकरूप होतो. आणि अंध लोकांच्या जगण्याच्या संघर्षाची जाणीव होऊ लागते.

चित्रपट हा समाज जीवनाचे चित्रण करणारा आरसा असतो. भारतीय समाज हा अंध, अपंग, मतिमंद, गतिमंध यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचे बारकावे टिपत असतो. गुलजार दिग्दर्शित 'कोशिश' या चित्रपटात संजीव कुमार आणि जया बच्चन मूकबधिर जोडप्यांची भूमिका साकारताना दिसतात. या चित्रपटातून असंवेदनशील समाजात अपंगानां कराव्या लागणाऱ्या त्रासाचे प्रभावीपणे चित्रण केले आहे. 'सगमा' या चित्रपटातून मानसिक आघाताने ग्रस्त व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर प्रकाश टाकला आहे. बाळू महेंद्र दिग्दर्शित या चित्रपटातून एका कार अपघातात डोक्याला दुखापत होऊन गतिमंध झालेल्या मुलीची कहाणी आहे. अपघातात डोक्याला मार लागल्यामुळे लहान मुलाप्रमाणे वागत

असते. त्यामुळे ती समाजातील वासनांची बळी होते. वेश्या व्यवसायाकडे अडकवली जाते. अशा परिस्थितीत एक शिक्षक तिला त्या दलदलितून बाहेर काढतो. अशा मानसिक विकारांसी संबंधित कलंक दूर करण्यासाठी चित्रपटांसारखे माध्यम प्रभावीपणे वापरता येते, हे दिसून येते.

'तारे जमीन पर' या चित्रपटातून अपंगत्वामुळे मानसिक आजार आणि मानसिक विकाराचे चित्रन केल्याचे दिसून येते. यात आठ वर्षाच्या मुलाला 'डिस्लेक्सिया' सारखा आजार जडतो. त्याच्याकडे समाजाचा दृष्टिकोन केवळ आळशी मुलगा म्हणून पाहिले जाते. त्यामुळे सर्वजण त्याला नाकारतात, त्याला सतत टाळतात, त्याची हेटाळणी केली जाते. पण त्याच्या बोर्डिंग मधील एका संवेदनशील मनाच्या, उत्साही, कला शिक्षकांच्या हे लक्षात येते, तो शिक्षक त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवतो. त्याच्या अंतर्मनात प्रवेश करून त्याच्या समस्ये मागील कारण समजून घेण्यास सुरुवात करतो. तेव्हा तो मुलगा सामान्य मुलाप्रमाणे वर्तन करण्याला सुरवात करतो. सामान्य मुलाप्रमाणे सर्वांची मने जिंकन्यास सुरुवात करतो.

भारतीय चित्रपटातून प्रेम, प्रणय भावना, भडकपणा, हिंसा यांचे चित्रण केले जाते, असे आरोप होतात. पण बहुतांस चित्रपट सामाजिक जाणिवेतून साकार झाल्याचे दिसून येते. सोनाली बोस दिग्दर्शित 'मार्गारिट विथ स्ट्रॉ' या चित्रपटाचे मुख्य पात्र सेरेब्रल हा 'पक्षाघात' या आजाराने ग्रस्त असतो. अशा आजाराने ग्रस्त असणाऱ्या कुमारवयीन मुलांच्या लैंगिक इच्छांचा शोध यातून घेण्याचा प्रयत्न झाला आहे.

**सारांश :**

चित्रपटांच्या माध्यमातून अपंगत्वाचे चित्रण हे एक सामाजिक बदलाचे धोतक आहे. जन-मनावर अधिराज्य करणाऱ्या दृकश्राव्य माध्यमातून प्रेक्षकांना शिक्षित, जागृत आणि जबाबदार बनवले जात असते. लोकांना सुद्धा इतर माध्यमा पेक्षा हे माध्येम जास्त प्रभावीपणे मनावर बिंबवताना दिसून येते. दिव्यांग व्यक्तीबद्दल प्रेक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, सद वर्तन आणि सखोल ज्ञान प्रसारित करण्यात अलीकडच्या चित्रपट निर्मात्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. हे त्यांचे सामाजिक क्षेत्रातील सर्वोत्तम योगदान असल्याचे दिसून येते. चित्रपट हे संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून चित्रपटाच्या सकारात्मक भूमिकेचे समर्थन केले पाहिजे. त्यांच्या या उत्तम कार्यामुळेच अपंगत्वाबद्दलच्या समाजातील वाईट गोष्टी आणि निषिद्धांविरुद्ध सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी चित्रपट पटकथा लेखन हे एक साधन म्हणून प्रभावी वापर करता येते.

**संदर्भ**

१. आर्म्स सी. शहा एन. वेंकटेश बी.के. : 'हिंदी चित्रपटातील इ.सी.टी चे चित्रण', इ.सी.टी खंड-२६.
२. भूर्ग्रा डी. : 'पारंपारिक हिंदी सिनेमातील मानसिक अजारचे चित्रण', मानसशास्त्र वार्ता.२००६.
३. हेलेन केलर : 'माझ्या आयुष्याची कहाणी', कॉस्मिकॉल्ने पब्लिकेशन, २००९.

:::. Cite this article .:::

गित्ते, प्रा. डॉ. सुर्यकांत हरिश्चंद्र. (2024). समाज जागृतीचे प्रभावी माध्यमे : चित्रपट पटकथा लेखन.

Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 256–258.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.51